कनिष्ठ सहाय्यक या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुनःस्थापित करणेबाबत.
(श्री. रणशुर रोहित शशिकांत, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, जि.प.सा.बा.उत्तर विभाग अहिल्यानगर)

**अहिलानगर जिल्हा परिषद**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-आस्था/३/९७४७३६/११२७/२०२५**
**अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे**

**वाचा-:** १. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रंनिप्रआ.१११९/प्र.क्र. ८६/११-अ दिनांक १४ ऑक्टोबर २०११
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र-निप्रआ.१११२/प्र.क्र. ८२/११-अ दिनांक २० एप्रिल २०१३
३. निलंबन आदेश क्र.बांध/कार्या/आस्था-४/९७६/२०२४ दिनांक २८/११/२०२४
४. इकडील दोषारोप पत्र क्र-आस्था/साप्रवि.३/९७४७३६/५६३२०२/५ दि १४/०६/२०२५
५. इकडील आदेश क्र साप्रवि /आस्था-३/९७४७३६/११२६२०२/५ दि १४/०६/२०२५

श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे जि.प.सा.बा उत्तर विभाग अहिल्यानगर येथे कार्यरत असताना श्री रणशुर यांनी कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा केल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) जि.प.सा.बा उत्तर विभाग अहिल्यानगर यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्रमांक ५ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५) च्या तरतुदीनुसार श्री. रणशुर यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात येत आहे.

सबब संदर्भ क्रमांक १ व २ मधील तरतुदी विचारात घेऊन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना विभागीय चौकशीच्या अधिन राहून जिल्हा परिषद सेवेत पुनःस्थापित करणेत येवून, त्यांना कार्यकारी पदावर पं. स. जामखेड येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की, श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांचे निलंबन कालावधीचा निर्णय शिस्तभंग कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202601210400023 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 21-01-2026 22:38:51
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२..

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

२/- श्री. रणशुर रोहित शशिकांत, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर सेवेत रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत:- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.उत्तर विभाग अहिल्यानगर, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

स्वाक्षरी--/-
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर